Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३०] गुरुवार, सप्टेंबर १, २०२२/भाद्रपद १०, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५०२.

**मुख्याधिकारी तथा प्रशासक, चिखली नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंर्तगत चिखली नगर परिषद [मूळ हद्द दु.सु.+वाढिव हद्द] विकास योजना तयार करणेचा इरादा**

**अधिसूचना**

क्रमांक-नपचि-३१६०-२०२२.—

ज्याअर्थी, चिखली नगर परिषद क्षेत्राकरिता विकास योजना [मूळ हद्द (सु.)] व वाढिव हद्द अशा दोन विकास योजना मंजूर असून त्या लागू झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :—

(१) चिखली नगरपरिषदेच्या मूळ हद्दीची प्रथम विकास योजना शासन अधिसूचना क्र. टिपीएस-२६७६-२०५३-युडि-५, अन्वये दि. ६ जानेवारी १९७७ रोजी मंजूर झालेली असून ती दि.१३ फेब्रुवारी १९७७ पासून अंमलात आलेली आहे.

(२) चिखली नगरपरिषद क्षेत्राकरिता प्रथम हद्दवाढ शासन आदेश क्र.एमयुएन-१२६९-९१८८-सीआर-३२८-८६ युडि-९, अन्वये दि.१०-०९-१९८७ नुसार मंजूर झालेली आहे.

(३) चिखली नगरपरिषदेच्या मूळ हद्दीची सुधारित विकास योजना व प्रथम हद्दवाढ क्षेत्राची विकास योजना नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२६००-१०२-प्र.क्र.१८(बी) २०००-नवि-३०, अन्वये दि. २५ सप्टेंबर २००३ नुसार मंजूर झालेली असून ती १० नोव्हेंबर २००३ नुसार अंमलात आलेली आहे. नगरपरिषदेची सुधारित विकास योजना मंजूर होऊन सुमारे १८ वर्षाचा कालावधी लोटला असून दुस-यांदा सुधारित होणेकरिता, विकास योजना तयार करणे व मंजुरी प्राप्त होते वेळी लागणारा कालावधी विचारात घेता उक्त विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३८ चे तरतुदी नुसार दुस-यांदा सुधारित करणे आवश्यक आहे.

(४) चिखली, नगरपरिषद क्षेत्राकरिता शासनाने नव्याने हद्दवाढ प्रस्तावास नगर विकास विभागाव्दारे जा. क्र. एमयुएन २०२०-प्र.क्र.२०४-नवि-१८, दि. ३०-०३-२०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग एक-अ मध्य उप विभाग, यामध्ये हद्दवाढीची उद्घोषणा प्रसिद्ध करण्यात आलेली असून नगर विकास विभागाव्दारे दि. २४-०३-२०२२ (गुरुवार) रोजी अंतिम उद्घोषणा प्रसिध्द करून चिखली नगर परिषदेची हद्दवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. सबब चिखली नगरपरिषदेची हद्दवाढ झाल्यानंतर ३ वर्षाच्या आत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम २१(२) चे तरतुदीनुसार हद्दवाढीची विकास योजना तयार होऊन प्रसिध्द करणे क्रम प्राप्त आहे. उक्त वाढीव नगरपरिषद क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१), सहकलम ३८ मधील तरतुदीनुसार चिखली नगर परिषदेने दि. १८-०४-२०२२ रोजी प्रशासकीय सभेत ठराव क्र. ०१ पारित करून नगर परिषदेच्या मूळ हद्दीची विकास योजना दुस-यांदा सुधारित करणे व प्रथम वाढीव हद्दीची विकास योजना सुधारित तयार करणे अशी एकत्रित विकास योजना तयार करण्याचा जाहिर केला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार चिखली नगर परिषदेस तयार करावयाच्या मूळ हद्द (दुसरी सुधारित) व तद्नंतरच्या वाढीव हद्दीची विकास योजना अशा एकत्रित विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा हद्द दर्शविणारा प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, चिखली नगरपरिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आला आहे.

चिखली नगरपरिषदेकडून इरादा जाहिर करण्यात आलेल्या मूळ हद्द (दुसरी सुधारित) व वाढिव हद्दीची विकास योजना अशा एकत्रित विकास योजनेच्या अनुषंगाने ज्या नागरिकांच्या या बाबत काही सूचना-हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत मुख्याधिकारी, चिखली नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरूपात व आपले म्हणने पृष्ठार्थ योग्य त्या कागदपत्रासह सादर कराव्यात. वरील विकास योजना तयार करतांना त्या सूचना हरकतींचा योग्य तो विचार नगर परिषदेकडून करण्यात येईल.

**आकाश सुरडकर,**
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
चिखली नगर परिषद, चिखली.

चिखली :
दिनांक १ सप्टेंबर २०२२.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५०३.

BY CHIEF OFFICER AND ADMINISTRATOR, CHIKHALI MUNICIPAL COUNCIL

**Declaration of intention to prepare Development Plan of Chikhali (2nd Revision of Original limit + Extended limit) Municipal Council (as per Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)**

*NOTIFICATION*

No. -MCC-3160-2022.—

Whereas, in Chikhali Municipal Council following town sanctioned Development Plans are exists.

(1) Revised Development Plan of Chikhali Municipal Council Original limit was approved by Government Notification TPS-2676/2053-UD-5, dated 06th January 1977 and came into force from 13th February 1977.

(2) Similarly, the Development Plan of Chikhali Municipal Council First Revised limit was approved by Government Notification No. TPS-2600/102-CR-18(B) 2000/UD 30, dated 25th September 2003 and came into force from 10th November 2003. 18 years have passed since the sanction of the First Revised Development Plan of Municipal Council. Considering the time required for preparation of Development Plan and its sanction, it is necessary to revise (2nd revision) the Development Plan as per Section 38 of MR&TP Act, 1966.

(3) The limits of Municipal Council Chikhali, has been revised second time which has been sanctioned according to the notification dated 30-03-2021. This has also been published in the Government Gazette of Amravati Division, dated 24-03-2022. It is necessary to prepare the Development Plan for the extended Municipal Council area as per Section 21(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 within 3 years of the extension of the limits of the Municipal Council for Planned development of said area.

Hence, the Municipal Council of Chikhali by its Administrator Resolution No. 01, dated 18-04-2022 has given consent to declare its intention to revise second time of Development Plan Chikhali Original Limit and prepare Development Plan of extended limit as per provision of Section 23(*1*) read with Section 38 and 21 (*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan attested by Chief Officer of Chikhali Municipal Council showing boundary of the area included in Development Plan of Municipal Council, Chikhali (2nd revision of original limit+ extended limit) is keep open for inspection for the public on office working days, during office hours at the office of the Chikhali Municipal Council, as per Section 23(*2*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Any suggestions/objections of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Chikhali Municipal Council. Within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*. The suggestions/objections with necessary documents shall be duly considered while preparing the Development Plan.

Chikhali:
Dated the 1st September 2022.

AAKASH SURADKAR,
Chief Officer & Administrator,
Chikhali Municipal Council, Chikhali.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.